**CNR No. MHSI01-000495-2026**

# <u>निशाणी ११ वरील आदेश</u>

१. अपिलार्थी यांनी सदरचा अर्ज हा दाव्यातील वाद मिळकतीची 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा आदेश करिता दाखल केलेला आहे. अपिलार्थी यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२ अपिलार्थी यांनी अपिल दाखल करुन निशाणी ५ वर सामनेवाला यांना कारणे दाखवा नोटीस काढण्यात आली होती. त्याची पुढील तारीख ०९/०६/२०२६ अशी ठेवण्यात आलेली होती. दरम्यानच्या काळात सदरचा अर्ज हा अपिलार्थी तर्फे तातडीचा हुकूम घेण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे अपिलार्थी याने केलेली कथने, दाखल केलेली छायाचित्रे यांचे अवलोकन केले असता, त्यांनी प्रथमदर्शनी युक्तिवाद करण्यासाठी योग्य व संयुक्तिक कारण निर्माण केल्यामुळे अर्ज दाखल करणे व युक्तिवादासाठी परवानगी देण्यात आलेली आहे.

३. अपिलार्थी यांचे अर्जामध्ये थोडक्यात कथन की, अपिलार्थी यांनी विशेष दावा क्र. ७८/२०२५ हा जाहिरनामा व इतर मागणीसाठी दाखल केला होता. त्यामध्ये निशाणी ५ वर तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल केला होता. तो अर्ज दि. ०६/०४/२०२६ रोजी फेटाळल्यामुळे त्याच्याविरुध्द सदर अपिल दाखल केलेले आहे. अपिलार्थींचे पुढे कथन की, दि. २७/११/१९९७ रोजीचे मृत्यूपत्र हे खोटे व बेकायदेशिर करुन मागितलेले आहे. तसेच, दावा मिळकतीमध्ये अपिलार्थींचा समान हिस्सा व ताब्याची मागणी केलेली आहे. अपिलार्थींच्या कथनानुसार दावा मिळकती वडीलोपार्जित असून त्यामध्ये अपिलार्थींचा अधिकार आहे. या अपिलाच्या दरम्यान दावा मिळकतीमध्ये सामनेवाला यांनी झाडे तोडलेली आहेत, विज खांब तोडून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केलेले आहे, त्यामध्ये असलेल्या घराची तोडफोड केलेली आहे. त्याबाबत

अपिलार्थी यांनी वेंगुर्ला पोलीस स्टेशन, एम.एस.ई.डी.सी., वनविभाग, ग्रामपंचायत यांच्याकडे तक्रारी करुनही दखल घेतलेली नाही. त्यामुळे अपिलाचा निकाल लागेपर्यंत सामनेवाला यांनी दावा मिळकतीमध्ये नुकसान करुन बांधकाम केले तर या अपिलार्थीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणारे आहे. तरी अपिलाचा निकाल होईपर्यंत सामनेवाला विरुध्द दावा मिळकतीची आहे तशी परिस्थिती कायम ठेवण्यासाठी आदेशीत करावी, अशी विनंती केलेली आहे.

४. अपिलार्थी यांच्या कथनांचा व दाखल कागदपत्रांचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता, अपिलार्थी व सामनेवाला यांच्यामध्ये मिळकतीसंबंधी वाद चालू आहे. सबब, अपिलार्थी यांनी दाखल केलेली छायाचित्रे यांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सामनेवाला याने दावा मिळकतीमध्ये झाडे तोडलेली आहेत, घराचे नुकसान केलेले आहे. सबब, या दाखल छायाचित्रावरुन अपिलार्थीच्या कथनास पुष्टी मिळते की, सामनेवाला हे दावा मिळकतीमध्ये झाडे तोडणे, घर पाडणे इत्यादी कार्य करत आहेत. अशा परिस्थितीमध्ये अपिलार्थी व सामनेवाला यांच्यामध्ये दावा मिळकतीबाबत वाद चालू आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा मिळकतीची परिस्थिती ही अपिलाचा निर्णय होई तोपर्यंत अथवा सामनेवाला हजर होऊन म्हणणे दाखल करे पर्यंत 'जैसे थे' ठेवणे योग्य व उचित होणारे आहे. तसे न केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणारे आहे व अपिलाच्या दरम्यान सामनेवाला याने दावा मिळकतीचे नुकसान पुढे चालू ठेवले तर, अपिलाचा निर्णय करतेवेळी वाद विषय संपुष्टात येणार आहे. त्यामुळे त्याठिकाणी अपिलार्थी याने दाखल कथनांच्या व उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे प्रथमदर्शनी केस शाबित केलेली आहे. सबब, वरील कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश करीत आहे:-

## आदेश.

१. अपिलार्थी यांचा निशाणी ११ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला यांना आदेश करण्यात येतो की, त्यांनी आज तारखेस असणारी दावा मिळकतीची परिस्थिती ही पुढील तारखेपर्यंत 'जैसे थे' ठेवण्यात यावी.

३. वरील आदेश हा का कायम करण्यात येऊ नये? अशी सामनेवाला विरुध्द कारणे दाखवा नोटीस काढण्यात येत आहे.

४. अपिलार्थी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी दावा मिळकतीची आज असलेली परिस्थितीचे सद्यस्थितीचे वर्णन व सद्यस्थिती काय आहे? यांची छायाचित्रे व प्रतिज्ञालेख दोन दिवसांत सादर करावा. तसे न केल्यास सदर आदेश पुढे कायम केला असे गृहित धरता येणार नाही.

५. अपिलार्थी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी आदेश ३९ नियम ३(अ) नुसार सदर आदेशाची प्रत सामनेवाला यांना बजावण्यात यावी व त्याबाबत प्रतिज्ञालेख व पुरावा नियमानुसार हजर करावा.

६. आवश्यकता असल्यास तात्काळ आदेशीका व स्पेशल बेलीफ यांची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.05.15 17:02:33 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १५/०५/२०२६

( श्री.एस.एस.इंदलकर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.